महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या राज्य शासनाद्वारे नामनिर्देशित संचालक मंडळाची पुनर्रचना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक:-केंपुयो/वखार१४१८/प्र.क्र.११२/१-स
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दि. २९ जुलै, २०१९.

<u>वाचा:-</u> १. शासन निर्णय क्र. केंपुयो/वखार२०१८/प्र.क्र.१४६/१-स, दि.२६.०९.२०१८.
२. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे यांचे दि.१५.१२.२०१८ चे पत्र.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाची स्थापना Warehousing Corporation Act, १९६२ या केंद्रीय कायद्यानुसार झालेली आहे. या कायद्यातील नियम २०(१) मधील तरतूदीनुसार एकुण ११ संचालक आहेत. संचालक मंडळाची रचना ही सर्व राज्याच्या वखार महामंडळासाठी समान आहे. त्यानुसार ५ संचालकांचे नामनिर्देशन हे केंद्रीय वखार महामंडळाद्वारे करण्यात येते व ५ संचालकांचे नामनिर्देशन राज्य शासनाद्वारे केले जाते. तसेच, राज्य शासनातर्फे १ व्यवस्थापकीय संचालक यांची नियुक्ती करण्यात येते. राज्य शासनाद्वारे नामनिर्देशित करावयाच्या महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या संचालक मंडळाची पुनर्रचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार वाचा येथील क्र.१ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या राज्य शासनाद्वारे नामनिर्देशित करावयाच्या संचालक मंडळाची पुनर्रचना करण्यात आलेली होती. तथापि, वखार महामंडळातील कामकाजाच्या अनुषंगाने काही संचालक बदलण्याची विनंती वाचा येथील क्र.२ च्या पत्रान्वये अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे यांनी केलेली होती. त्यास अनुसरुन काही नामनिर्देशित संचालक बदलण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय :-</u>

Warehousing Corporation Act, १९६२ मधील नियम २०(१) मधील तरतूदीनुसार राज्य शासनाद्वारे महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या ५ संचालकांची नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करावयाची आहे. त्यानुसार या शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या संचालक मंडळाची खालीलप्रमाणे नियुक्ती करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र.	**दि.२६.०९.२०१८ च्या शासन निर्णयान्वये नियुक्त करण्यात आलेले संचालक मंडळ**	**बदल करण्यास मान्यता देण्यात येत असलेले संचालक मंडळ**
१.	आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे	आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे
२.	आयुक्त (सहकार), सहकार आयुक्तालय, पुणे	मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे
३.	वित्त विभागाचे प्रतिनिधी (उप सचिव दर्जापेक्षा कमी नाही)	पणन संचालक, पणन संचालनालय, पुणे.
४.	व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्या, मुंबई	कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे.
५.	व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या, मुंबई	व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या, मुंबई.

२. सदर शासन निर्णय शासनाच्या मान्यतेनुसार व Warehousing Corporation Act, १९६२ मधील नियम २०(१) मधील तरतूदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक **२०१९०७३०१७१३५०९२०२** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jaiprakash Mansaramji Ambade

Digitally signed by Jaiprakash Mansaramji Ambade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Cooperative Marketing, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9ce079d77649e3080d74540a4a9ae7f6502ac7e6273891f24ffda6ebea493dce, serialNumber=d214bfebdf948d521ecc91e9cb1487d0cce508098bc2232154c36daba7635819, cn=Jaiprakash Mansaramji Ambade
Date: 2019.07.30 17:19:27 +05'30'

(ज.म. अंबादे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.विरोधी पक्ष नेते विधानसभा व विधानपरिषद.
२. महालेखापाल-१ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
३. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
४. महालेखापाल-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र, नागपूर.

५. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. मा.प्रधान सचिव (पणन), मंत्रालय, मुंबई.
७. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, ५८३/ब, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे-४०० ०३७.
८. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०.मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे.
११.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या, मुंबई.
१२.आयुक्त (सहकार), सहकार आयुक्तालय, पुणे.
१३.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्या, मुंबई
१४.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या, मुंबई.
१५.मा. मंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव.
१६.मा. राज्यमंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव.
१७. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१८. निवडनस्ती (१-स).

****